# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
# जवाहर बालभवन
**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**
**नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**

सर्व शिक्षा अभियान ही योजना केंद्रपुरस्कृत योजना आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या हिश्श्याचे प्रमाणे ६०:४० याप्रमाणात आहे. भारत सरकार दरवर्षी या योजनेकरीता अंदाजपत्रक मंजूर करते. या योजनेची राज्यस्तरावरून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद या स्वायत्त संस्थेमार्फत अंमलबजावणी करण्यात येते. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. त्या अंतर्गत शाळांना पायाभूत भौतिक सुविधा, बांधकाम, मुलींच्या शिक्षणासाठी उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी उपाययोजना, शिक्षकांच्या, लोकप्रतिनिधींच्या, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या क्षमता संवर्धनासाठी प्रशिक्षण, दिव्यांग (विशेष गरजाधिष्ठित) बालकांना सोयी-सुविधा, दुर्बल घटक व वंचित गटातील बालकांना शिक्षणाची संधी, शाळाबाह्य मागास गटातील मुलींसाठी निवासी शाळा, सर्व मुला-मुलींना मोफत पाठ्यपुस्तके, लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश योजना, इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी शालेय शिक्षण विभागासाठी Key Result Area (KRA) उद्दिष्टे दिली असून राज्याला राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम तीन राज्यात आणणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व शिक्षणामध्ये सुधारणा करण्यासाठी विविध धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. यामध्ये प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम आखला असून त्यासाठी दिनांक २२ जून, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमुळे राज्यात रचनावादाचा अवलंब करत शाळा मोठ्या प्रमाणात प्रगत होत आहेत. डिजीटल शाळा, एबीएल शाळा, आयएसओ शाळांची वाढ होत असून पर्यवेक्षीय यंत्रणेच्या भूमिकेत झालेले परिवर्तन, शैक्षणिक विचारांची देवाणघेवाण यासाठी आयोजित करण्यात आलेली शिक्षणाची वारी, इत्यादी बाबींचा समावेश आहे. यासर्व बाबींमधून विभागास १०० टक्के मुले शिकण्याच्या उद्देशाने परिणाम दिसत आहेत.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयातंर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ **शैक्षणिक सल्लागार (गुणवत्ता)** याकरिता करार (Contractual) स्वरुपात पद भरावयाची आहे. सदर नियुक्तीसाठी पात्र व योग्य उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. यासाठी आवश्यक अर्हता व अनुभव पुढील प्रमाणे दर्शविल्यात आहेत.

| अ. | पदनाम व एकत्रित | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | **शैक्षणिक सल्लागार (गुणवत्ता)** | १ | १) पदव्युत्तर पदवी | ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे. | १) शिक्षण संचालक पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव.<br>२) राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट कार्यक्रम सुरु आहे. त्याबाबत अभ्यास व आवड, असणे आवश्यक आहे. |

- **नियुक्तीचे मुख्यालय :-** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक, मुंबई परंतु रहाण्याचे ठिकाण लवचिक.
- **वेतन व इतर भत्ते :-** सामान्य प्रशासन विभाग शा. नि. संकिर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६.अन्वये निश्चित केल्याप्रमाणे अदा करण्यात येईल. (शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने )
- **नियुक्तीचे स्वरुप :-** करार (Contractual) स्वरुपात नियुक्ती राहील.
- **नियुक्तीची कालमर्यादा :-** प्रथम १ वर्षासाठी व आवश्यकतेनुसार तीन वर्षांपर्यंत किंवा वय ६५ वर्षे होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत वाढवता येईल.
- **निवड प्रक्रिया :- a)** उमेदवारांनी या कार्यालयाकडे लेखी अर्ज सादर करावेत.
  **b)** उपरोक्त अर्हतेनुसार पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.
  **c)** पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वतंत्र दिनांक कळविण्यात येईल.
  **d)** उमेदवारांचे व्हीजन व सादरीकरण या निकषानुसार निवड करण्यात येईल.
- **कामाचे स्वरुप आणि व्याप्ती :-**

१) प्रगत शैक्षणिक कार्यक्रमाची प्रभावी अमंलबजावणी करणे.

२) प्रक्रिया अहवालाचे विश्लेषण करणे, विश्लेषणानुसार गुणदान करुन व जिल्हयांची रॅकिंग (क्रमवारी) निश्चित करुन प्रत्येक शाळा प्रगत होण्यासाठी प्रतिमाह शिक्षणाधिकारी, प्राचार्य (DIECPD) आणि विभागीय शिक्षण उपसंचालकांचा राज्यस्तरावर/ जिल्हास्तरावर आढावा घेणे.

३) राज्यातील प्रत्येक मूल सक्षमतेने शिकू शकते. याबाबतचा दृढ विश्वास निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आणि मे- २०१८ पर्यंत राज्यातील शंभर टक्के शाळा प्रगत करण्यात येतील. ज्यामुळे एकही बालक शिक्षण वंचित अथवा शाळाबाहय होणार नाही. यादृष्टीने प्रयत्न करणे.

४) ज्या शिक्षकांनी उत्कृष्ठ ज्ञानरचना वादी (उदा. कुमठेबीटला, पाष्ठेपाडा) व राज्यातील अन्य प्रगत शाळांना भेटी दिलेल्या नाहीत, अशा १००% शिक्षकांना प्रेरित करुन स्वखर्चाने शाळा भेटीची संधी देण्याबाबतचे नियोजन व त्याप्रमाणे कार्यवाही करणे व उद्दिष्ट पूर्तीकरण्यासाठी प्रयत्नशील रहाणे.

५) ज्या शाळा ज्ञानरचनावादी झाल्या नाहीत अशा शाळांचे मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुखांची विभागस्तरावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करुन १००% शाळा ज्ञानरचनावादी करण्यासाठी प्रयत्न करणे.

६) जिल्हयातील केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी प्रतिमाह (DIECPD) प्राचार्य, विभागिय विद्या प्राधिकरण आणि सर्व शिक्षणाधिकारी यांच्यासमवेत राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठकांचे आयोजन करणे व नियोजन करुन मा. प्रधान सचिव आणि राज्य प्रकल्प संचालक यांना सादर करणे.

७) सार्वत्रिक शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने इतर विभागांसोबत समन्वयन बैठकांचे आयोजन करणे.

८) विभागीय स्तरावर सर्व गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, प्राचार्य व प्राध्यापक (DIECPD) यांची १००% शाळा प्रगत करण्याबाबत विभागीय परिषदा जुलै २०१७ ऑक्टोबर २०१७ आणि डिसेंबर २०१७ या महिन्यात आयोजित करावी व आढावा घेण्यात यावा.

९) शाळा भेट ही प्रेरणादायी आणि अध्ययन अध्यापनास दिशा देणारी बाब आहे. राज्यस्तर, विभागस्तर आणि जिल्हास्तरावरुन प्रतिमाह किमान १० दिवस त्वरीत परिणाम दर्शविणाऱ्या शाळा भेटी आयोजित करावी.

१०) राज्यातील १००% शिक्षकांना तंत्रस्नेही होण्याचे स्वेच्छा प्रशिक्षण देण्यात येऊन राज्यातील १००% शाळा / वर्ग ऑगस्ट २०१७ पर्यंत लोक सहभागातून डिजीटल करण्यासाठी प्रयत्न करावा.

११) पायाभूत आणि संकलित चाचण्यांमधील उपलब्ध सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करणे. शाळा, केंद्र, गट, जिल्हा आणि विभागनिहाय क्षमता, आशय आणि विषयांच्या अनुषंगाने DIECPD कडून विश्लेषण करुन घेण्यात येईल आणि त्यातून प्राप्त निष्कर्षाचा दिशा निश्चितीसाठी उपयोग करुन घ्यावा.

अर्जदारांनी विहीत नमुन्यातच अनुभव व प्रमाणपत्राच्या प्रती जोडून **राज्य प्रकल्प संचालक** यांच्या नावे वरील पत्त्यावर अर्ज दिनांक २४/०७/२०१७ पर्यंत सादर करावेत. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. सध्या सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांनी यांनी सदर पदांसाठी अर्ज सादर करु नयेत.

**अटी व शर्ती :-**

**१.** करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/समावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

**२.** नियुक्तीसाठी सक्षम अधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

**३.** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्य कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा इतर कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

**४.** करारा पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

**५.** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

**६.** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यामापन करतील.

**७.** निवड प्रकियेचे सर्व अधिकार हे मा. राज्य प्रकल्प संचालक यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे.

**राज्य प्रकल्प संचालक ,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**